# मेट्रो-३ च्या भुयारीकरणाचा ३५वा टप्पा पूर्ण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) सिद्धिविनायक ते दादर हा १.१२ किमी इतका लांब ३५वा भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. या भुयारीकरणासह पॅकेज-४चे एकूण १०.९६ किमी लांबीचे भुयारीकरण पूर्ण झाले. यासाठी ३ टीबीएम मशिन्स कार्यरत होत्या.

एकूण ७ पैकी ४ पॅकेजेसमध्ये भुयारीकरण १००% पूर्ण झाले आहे. विशेषत: पॅकेज-४ मध्ये भुयारीकरण करणे एक आव्हानात्मक काम होते, कारण या पॅकेजमधील सर्व विकासकामे रस्त्यावरील वाहतूक, धार्मिकस्थळांच्या जवळपास आहेत. शहराचे मुख्य केंद्र मानले जाणारे दादर, मेट्रो-३ द्वारे जोडले जाईल व मुंबईकरांच्या प्रवाशांच्या अडचणी कमी होतील,असे मुं.मे.रे.कॉ चे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल म्हणाले. हेरेन्कटनेट कंपनीद्वारे बनलेले व अर्थ प्रेशर बॅलेन्स (ई.पी.बी) तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) कृष्णा-१ द्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले.

७ जुलै, २०२० पासून या टप्प्याचे काम सुरू करण्यात आले होते. ८०५ रिंग्सचा वापर करून डाऊनलाइनचे काम पूर्ण करण्यात आले. दादर मेट्रो स्थानाकाचे जवळपास ४२% काम पूर्ण झाले आहे, एस. के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), मुं.मे.रे.कॉ यांनी सांगितले.



- नयानगर ते धारावी (अपलाईन - ५८९ मी आणि डाउनलाईन - ५८९ मी),
- नयानगर ते दादर (अपलाईन - २४९१ मी आणि डाउनलाईन - २४७२ मी),
- सिद्धिविनायक ते दादर (अपलाईन - ११०६ मी आणि डाउनलाईन - ११२६ मी),
- सिद्धिविनायक ते वरळी (अपलाईन - १३०५ मी आणि डाउनलाईन - १२८४ मी)